ePaper


# नरेंद्र मोदींची हुकूमशाही मोडून काढणार; अभिजीत दिपकेंची घोषणा




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 12 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 3 वरुन...

रिंगरोडचे घोंगडे ३३ वर्षांपासून भिजत!

## आंदोलनादरम्यान वाहतूक निर्बंधांवर प्रश्न; केंद्र आणि दिल्ली पोलिसांना नोटीस

# सुप्रीम कोर्टाचा सरकारला दणका!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीने (CJP) शनिवारी (१० ऑक्टोबर) दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन पुकारले होते. या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मेट्रो स्थानके बंद करणे, रेल्वे वाहतुकीवर निर्बंध आणि नागरिकांना ताब्यात घेतल्याच्या आरोपांवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेतली. सार्वजनिक वाहतूक सुरळीत ठेवण्याचे निर्देश देतानाच न्यायालयाने केंद्रीय गृहसचिव, दिल्लीचे पोलीस आयुक्त आणि दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (डीएमआरसी) अवमान कारवाईची नोटीस बजावली.**




न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहाना यांच्या खंडपीठाने सार्वजनिक सुव्यवस्था राखताना वाहतुकीवर अनावश्यक निर्बंध लादू नयेत, असे स्पष्ट केले. कायदेशीर आवश्यकता नसताना इंटरनेट सेवा खंडित करू नये, तसेच नागरिकांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेऊ नये, असे निर्देशही न्यायालयाने दिले. कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करताना नागरिकांची मुक्त हालचाल आणि सार्वजनिक वाहतुकीच्या गरजा विचारात घेण्यास सांगितले.

आंदोलनादरम्यान ४५ मेट्रो स्थानके बंद करण्यात आल्याचा, तसेच राजकीय नेते, वकील, पत्रकार आणि सामान्य नागरिकांना ताब्यात घेतल्याचा आरोप याचिकांमध्ये करण्यात आला होता. वकील आणि माध्यमकर्मींवर बळाचा वापर झाल्याचे दावेही न्यायालयासमोर मांडण्यात आले. या आरोपांबाबत केंद्र सरकार आणि संबंधित यंत्रणांना उत्तर द्यावे लागणार आहे.



न्यायालयाने दिल्ली मेट्रोची कोणती स्थानके बंद होती आणि कोणती सुरू होती, हे दर्शवणारा नकाशा सादर करण्यास सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात आणि आसपास लागू करण्यात आलेल्या भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत निर्बंधांबाबतच्या नोटिसा अद्याप हटवल्या नसतील, तर त्या हटवण्याचे निर्देशही देण्यात आले. वकिलांना त्यांच्या व्यावसायिक कर्तव्यांचे पालन करण्यापासून रोखू नये, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, शनिवारी रात्री १० वाजेपर्यंत सर्व मेट्रो स्थानके पुन्हा सुरू करण्यात आली होती आणि इंटरनेट सेवाही पूर्ववत करण्यात आली होती. मात्र, आंदोलनादरम्यान झालेल्या कारवाईची कायदेशीरता आणि सार्वजनिक वाहतुकीवरील निर्बंधांची आवश्यकता याबाबत न्यायालयाने संबंधित यंत्रणांकडून स्पष्टीकरण मागितले आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी मंगळवारी होणार असून, केंद्र सरकार आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या उत्तराकडे लक्ष लागले आहे.

### सार्वजनिक वाहतूक सुरळीत करा...

न्यायाधीश जॉयमाल्या बागची आणि न्यायाधीश व्ही. मोहाना यांच्या पीठाने निर्देश दिले की, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी मेट्रो आणि रेल्वे सेवा सामान्यपणे सुरू राहाव्यात. कायद्यानुसार इंटरनेट सेवा खंडित केली जाऊ नये.” कायदेशीर निर्बंध आणि वाहतुकीच्या गरजा लक्षात घेऊन लोकांना आणि वाहतुकीला मुक्तपणे फिरण्याची परवानगी देण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले.

### वाहतुकीवरील निर्बंधांवर न्यायालयाचे प्रश्न

सर्वोच्च न्यायालयाने अधिकाऱ्यांना कायदा व सुव्यवस्था आणि वाहतुकीची गरज लक्षात घेऊन बॅरिकेड्स लावण्याबाबत पुनर्विचार करण्यास सांगितले आहे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून कोणती स्थानके बंद करण्यात आली होती आणि कोणती सुरू होती, हे दर्शवणारा नकाशाही न्यायालयाने मागवला. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितलं की, शनिवारी रात्री १० वाजेपर्यंत सर्व मेट्रो स्थानके पुन्हा सुरू करण्यात आली होती आणि इंटरनेट सेवा पूर्ववत करण्यात आली होती. सार्वजनिक सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळण्यासाठी निर्बंध आवश्यक असल्याशिवाय मेट्रो आणि रेल्वे सेवा सामान्यपणे सुरू राहिल्या पाहिजेत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### सर्वोच्च न्यायालयाने बजावली नोटीस

आंदोलनादरम्यान वाहतूक सेवांवरील निर्बंधांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशांचे कथित उल्लंघन केल्याप्रकरणी न्यायालयाने केंद्रीय गृहसचिव, दिल्लीचे पोलीस आयुक्त आणि दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) यांना अवमान कारवाईची नोटीस बजावली. सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात आणि आजूबाजूला कलम १६३ चे निर्बंध लागू केल्याची घोषणा करणाऱ्या नोटिसा अद्याप हटवल्या नसतील, तर त्या हटवण्याचे निर्देशही न्यायालयाने अधिकाऱ्यांना दिले. वकिलांना त्यांच्या व्यावसायिक कर्तव्यांचे पालन करण्यापासून रोखले जाऊ नये, असे न्यायालयाने म्हटले.

# पुण्याच्या तरुणाला फ्रान्समध्ये २० वर्षांची शिक्षा!

## अल्पवयीन मुलींचे शोषण आणि ब्लॅकमेलिंग प्रकरण; ‘CVLT’ नेटवर्कचा मुख्य सूत्रधार दोषी ठरला

**महाईन्यूज । पुणे**

**फ्रान्सच्या सरकारी वकिलांनी न्यायालयात रोहित राणेचे वर्णन करताना तो “नाझी विचारांचा समर्थक, अत्यंत क्रूर आणि हिंसेची आवड असणारा विकृत व्यक्ती” असल्याचे सांगितले. वकिलांनी त्याला तब्बल ३० वर्षांच्या कारावासाची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने त्याच्यावर सिद्ध झालेल्या गुन्ह्यांसाठी कायद्यात असलेली जास्तीत जास्त २० वर्षांची शिक्षा सुनावली. निकाल वाचनावेळी तेथे उपस्थित असलेल्यांनी दिलेल्या माहितीनुसार, निकाल ऐकताना रोहित राणेच्या चेहऱ्यावर पश्चात्तापाचा कोणताही भाव नव्हता.**



सोशल मीडियाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर चिमुकल्यांचे शोषण करणाऱ्या एका मोठ्या गुन्हेगारी टोळीचा फ्रान्समध्ये पर्दाफाश केला आहे. ‘CVLT’ नावाचे एक हिंसक आणि विकृत ऑनलाईन नेटवर्क चालवणाऱ्या आणि त्यात मुख्य भूमिका बजावणाऱ्या महाराष्ट्रातील पुणे येथील रोहित राणे (वय २९) याला पॅरिस येथील न्यायालयाने २० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.

ब्रिटन, अमेरिका आणि कॅनडामधील अल्पवयीन मुलींना ब्लॅकमेल करून त्यांच्याकडून विकृत कृत्ये करून घेणे आणि त्यांचा शारीरिक-मानसिक छळ करणे, असा गंभीर ठपका रोहित राणेवर ठेवण्यात आला होता.

मूळचा महाराष्ट्रातील पुणे शहराचा असलेला रोहित राणे फ्रान्समधील अँटिबेस या शहरात एका व्यावसायिक शिक्षण संस्थेत शिक्षण घेत होता. त्यानंतर तो फ्रान्समध्येच एक क्रीडा प्रशिक्षक म्हणून काम करू लागला.

२०२०-२१ मध्ये अमेरिकन तपास यंत्रणांनी फ्रान्सच्या पोलिसांना रोहित राणेच्या संशयास्पद ऑनलाईन हालचालींबद्दल सावध केले. त्यानंतर दक्षिण फ्रान्समधील अँटिबेस येथून त्याला अटक करण्यात आली. सुरुवातीला त्याने हा सर्व प्रकार “गैरसमज” असल्याचे सांगून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला; परंतु नंतर तो ‘डिसकॉर्ड’ ग्रुपचा अॅडमिन असल्याचे आणि त्याला हिंसक व्हिडिओ पाहण्याची विकृत सवय असल्याचे त्याने पोलिसांसमोर कबूल केले.

अमेरिकेतील पाच पीडित मुलींची न्यायालयात बाजू मांडणारे वकिलांनी या प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त केला. “या विकृत कृत्यांमुळे निष्पाप बाधितांचे आयुष्य पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे,” असे ते म्हणाले.

वकील पुढे म्हणाले, “पीडितांची न्यायालयाकडून एकच अपेक्षा होती—गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन अशी कडक शिक्षा व्हावी, ज्यामुळे समाजात एक स्पष्ट संदेश जाईल. अशी कृत्ये कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाहीत आणि ही व्यक्ती पुन्हा समाजात जाऊन असा गुन्हा करू शकणार नाही, याची खात्री या निकालाने झाली पाहिजे.”

### ‘डिसकॉर्ड’ अॅपवरून सुरू होता जाचक खेळ

न्यायालयाच्या कागदपत्रांनुसार आणि ‘अॅसोसिएटेड प्रेस’ (AP) च्या अहवालानुसार, या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी जाळ्याने अल्पवयीन मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी ‘डिसकॉर्ड’ (DISCORD) या ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा वापर केला होता. या मुलींना मानसिकदृष्ट्या ताब्यात घेऊन त्यांना ‘गुलाम’ बनवले जात असे. रोहित राणे हा या आंतरराष्ट्रीय ऑनलाईन टोळीचा मुख्य सूत्रधार होता. बालकांचे लैंगिक शोषण, खंडणी वसुली आणि अल्पवयीन बालकांवर अनन्वित अत्याचार केल्याप्रकरणी त्याला दोषी ठरवण्यात आले आहे.

# डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आता बांधकामे महापालिकेच्या रडारवर!

**महाईन्यूज । पुणे**

**शहरात डेंग्यूच्या रुग्णसंख्येने सप्टेंबरमध्ये यंदाच्या वर्षातील उच्चांक गाठला असताना, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी पुणे महापालिकेने आता बांधकाम क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले आहे. महापालिकेच्या कीटक प्रतिबंधक विभागाच्या सप्टेंबरमधील अहवालानुसार, शहरात ३,३४८ दूषित कंटेनर आढळले असून, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी ४०२ नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत.**





‘आरोग्य विभागाला सहकार्य न करणाऱ्या ६०० हून अधिक बांधकाम आस्थापनांची यादी बांधकाम विभागाकडे देण्यात आली आहे. संबंधित ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे,’ अशी माहिती महापालिका आरोग्य विभागाने दिली.

महापालिकेच्या कीटक प्रतिबंधक विभागाने सप्टेंबरमध्ये शहरात ३ लाख ९८ हजार ९३० कंटेनर तपासले. त्यापैकी ३,३४८ कंटेनर दूषित आढळले. तसेच, २,४१२ घरांत डासोत्पत्तीची नोंद झाली. या कारवाईत १ लाख ४५ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत सर्वाधिक दूषित घरे (५९९) आणि कंटेनर (७२४) आढळले. कोथरूडमध्ये ३९५, तर कोंढवा-येवलेवाडीमध्ये ४१७ दूषित कंटेनरची नोंद झाली. शहरात २७,७५९ घरांमध्ये धूरफवारणी, तर ५३,२१२ घरांमध्ये औषधफवारणी करण्यात आली.

दरम्यान, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी नुकतीच विविध विभागांची समन्वय बैठक घेऊन डेंग्यू प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. बांधकामांच्या ठिकाणी डासांची उत्पत्ती आढळल्यास प्रथम नोटीस दिली जाते. त्यानंतरही परिस्थिती कायम राहिल्यास डासांची उत्पत्ती नष्ट करून शुल्क वसूल केले जाते. शुल्क भरण्यास नकार देणाऱ्या बांधकाम आस्थापनांची स्वतंत्र यादी तयार करण्यात आली आहे.

महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोथरूडमध्ये डेंग्यूचे रुग्ण विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात आढळले. या भागासह नगर रस्ता आणि औंध-बाणेरमध्ये मोठ्या प्रमाणावर बांधकामे सुरू आहेत. स्लॅबच्या क्युअरिंगसाठी साठविलेले पाणी आणि बांधकाम परिसरात दीर्घ काळ साचून राहणारे पाणी डासांच्या उत्पत्तीस पोषक ठरू शकते. त्यामुळे या भागांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे.

महापालिका सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी सांगितले की,जूनच्या तुलनेत सप्टेंबरमधील रुग्णसंख्या सुमारे साडेसहा पट जास्त आहे. दर वर्षी सप्टेंबरमध्ये डेंग्यूचे रुग्ण वाढतात. डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी गोदामे, पाइपलाइन आणि उघड्यावर ठेवलेल्या वस्तूंमध्ये पाणी साचू न देण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनीही गच्चीवरील जुनी टायर, रंगांचे डबे आणि रिकामी भांडी काढून टाकावीत. तसेच, कूलर, फ्रिज आणि वातानुकूलन यंत्रांमध्ये पाणी साचू देऊ नये.

# रिंगरोडचे घोंगडे ३३ वर्षांपासून भिजत!

## २,४३५ हरकतींनी पेच वाढवला; कोट्यवधींचा खर्च करूनही एचसीएमटीआर कागदावरच

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी प्रस्तावित ३१.४० किलोमीटरचा उच्च क्षमता द्रुतगती वर्तुळाकार मार्ग (एचसीएमटीआर) तब्बल ३३ वर्षांपासून रखडला आहे. १९९३ मध्ये संकल्पना मांडल्यानंतर वारंवार आराखडे बदलण्यात आले. काही भागांत बीआरटीएस, काही ठिकाणी मेट्रो, तर बोऱ्हाडेवाडी ते वाकड चौकादरम्यान ई-आरटीएसचे नियोजन करण्यात आले आहे. विविध वाहतूक प्रकल्पांतील समन्वयाचा अभाव, निधीची अनिश्चितता आणि नागरिकांचा विरोध यामुळे या प्रकल्पाचे भवितव्य अधांतरी आहे.**



२०१९ मध्ये प्रकल्पाला पुन्हा चालना देत महामेट्रोमार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला. त्यासाठी सुमारे पाच कोटी रुपये खर्च झाले. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर, राजेश पाटील यांच्यासह पुढील आयुक्तांनी विविध स्तरांवर प्रकल्पाचे सादरीकरण केले. मात्र, अद्याप संपूर्ण मार्गाच्या अंमलबजावणीचा निर्णय झालेला नाही.

सुरुवातीला निओ मेट्रोचा पर्याय विचारात घेण्यात आला होता. टायरवर धावणाऱ्या या विद्युत वाहनातून एका वेळी ७०० ते ७५० प्रवाशांची वाहतूक अपेक्षित होती. मात्र, हा पर्याय मागे पडला असून, बोऱ्हाडेवाडी, मोशी ते वाकड चौकादरम्यान सुमारे १७ किलोमीटरच्या मार्गावर ई-आरटीएस सुरू करण्याचे नियोजन आहे.

दरम्यान, दापोडी ते पिंपरी मेट्रो सुरू असून, निगडीपर्यंत विस्ताराचे काम सुरू आहे. निगडीतील भक्ती-शक्ती चौक ते चाकण असा ४७.२९५ किलोमीटरचा मेट्रो मार्गही प्रस्तावित आहे. काही भागांत बीआरटीएसची व्यवस्था असल्याने एचसीएमटीआरच्या मूळ मार्गाची आवश्यकता आणि व्यवहार्यता यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. दाट लोकवस्तीमुळे जागा संपादन करणे आणि संभाव्य विस्थापनामुळे नागरिकांचा विरोध हाताळणेही प्रशासनासाठी आव्हानात्मक ठरणार आहे.

महापालिकेच्या प्रारूप सुधारित विकास आराखड्यावर शहरभरातून ५६ हजार ७७९ हरकती दाखल झाल्या आहेत. त्यापैकी चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, काळेवाडी, थेरगाव आणि रहाटणी या भागांतून एचसीएमटीआरविरोधात २ हजार ४३५ हरकती नोंदवण्यात आल्या आहेत. बाधित नागरिकांनी हा मार्ग कायमस्वरूपी रद्द करण्याची मागणी केली असून, सुनावणी समितीच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

या प्रकल्पासाठी ३० मीटर रुंदीचा उन्नत मार्ग प्रस्तावित असून, नाशिक फाटा, पिंपळे गुरव, काळेवाडी, थेरगाव, वाल्हेकरवाडी, आकुर्डी, निगडी, त्रिवेणीनगर, रूपीनगर आणि इंद्रायणीनगर आदी भाग जोडण्याचे नियोजन आहे. प्रकल्पासाठी सुमारे २ हजार ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पीपीपी, बीओटी, केंद्र व राज्य सरकारचे सहकार्य किंवा महापालिका रोख्यांद्वारे निधी उभारण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

दरम्यान, विजयकुमार पाटील यांनी हा प्रकल्प महापालिकेच्या आर्थिक क्षमतेबाहेरचा असल्याचे सांगत, नगररचना विभागातील कथित बेकायदेशीर टीडीआर वाटपामुळे तो राजकीय नेत्यांच्या आर्थिक लाभासाठी कागदावर ठेवण्यात आल्याचा आरोप केला. हा प्रकल्प भविष्यात प्रत्यक्षात येण्याची शक्यता कमी असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाचे सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांच्या म्हणण्यानुसार, नियोजित मार्गापैकी सुमारे ६५ टक्के जागा ताब्यात आहे, तर ३० टक्के मार्गावर मेट्रो प्रस्तावित असल्याने तेथे एचसीएमटीआरची आवश्यकता राहणार नाही. बोऱ्हाडेवाडी ते वाकड चौकादरम्यान ई-आरटीएसला चांगला प्रतिसाद मिळाल्यास उर्वरित मार्गांचाही त्याच पद्धतीने विकास करण्याचा विचार आहे.

तीन दशकांहून अधिक काळ रखडलेल्या या प्रकल्पाबाबत आता ठोस निर्णय होण्याची गरज आहे. एचसीएमटीआर मूळ स्वरूपात साकार होणार, ई-आरटीएसचा पर्याय स्वीकारला जाणार की प्रकल्प गुंडाळला जाणार, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही.

### नेतेमंडळींच्या फायद्यासाठी प्रकल्प कागदावर

तब्बल 400 कोटी रुपये खर्चाचा हा एचसीएमटीआर रिंग रेल्वे प्रकल्प पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आर्थिक क्षमतेच्याबाहेर होता. सन 1980 ते 1992 च्या काळात जागतिक बँकेच्या मदतीशिवाय हा प्रकल्प अस्तित्वात येऊ शकत नव्हता. सन 1995 च्या डीपी अहवालात तशी नोंद आहे. त्यामुळे हा प्रकल्प फक्त नकाशातच राहिला. हा प्रकल्प कालबाह्य ठरला आहे. महापालिकेच्या नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर टीडीआर वाटप केल्यामुळे हा प्रकल्प राजकीय नेत्यांच्या आर्थिक लाभासाठी आजही कागदावर आहे. जो भविष्यात राबवला जाईल असे वाटत नाही, असे विजयकुमार पाटील यांनी सांगितले.

# नवरात्रीचा रंग चढला; पिंपरी-चिंचवडमध्ये गरब्याची धूमधडाक्यात तयारी!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भक्ती, शक्ती आणि उत्साहाचा संगम असलेल्या शारदीय नवरात्रोत्सवासाठी पिंपरी-चिंचवड शहर सज्ज झाले आहे. रविवार (दि. ११) पासून पुढील नऊ दिवस शहरात धार्मिक कार्यक्रमांसह दांडिया-गरबाचा उत्साह पाहायला मिळणार आहे. शहरातील ५० हून अधिक मैदानांवर दांडिया-गरबाचे आयोजन करण्यात आले असून, मंदिरांमध्येही घटस्थापनेची तयारी पूर्ण झाली आहे.**



आकुर्डीतील तुळजाभवानी मंदिर, पिंपरीतील वैष्णोदेवी माता मंदिर, चिंचवडमधील कालिका माता मंदिर आणि निगडीतील दुर्गादेवी मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात अभिषेक, होमहवन आणि आरतीसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दुसरीकडे, दांडिया-गरबासाठी तरुणाईमध्ये मोठा उत्साह आहे. वाकड, पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरात भव्य गरबा महोत्सवांची तयारी सुरू असून, तिकीटविक्रीलाही सुरुवात झाली आहे. नऊ दिवस, नऊ रंगांची संकल्पना यंदाच्या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, आकर्षक रोषणाई, डीजे, ऑर्केस्ट्रा आणि भव्य व्यासपीठांमुळे गरबा मैदानांवर उत्सवी वातावरण निर्माण होणार आहे.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात महिनाभर गरबा-दांडियाचे प्रशिक्षण वर्ग सुरू होते. लहान मुलींपासून मध्यमवयीन नागरिकांपर्यंत अनेकांनी या वर्गांमध्ये सहभाग घेतला. आता सराव पूर्ण झाल्याने प्रत्यक्ष मैदानावर दांडियाचा आनंद लुटण्यासाठी नागरिक उत्सुक आहेत. विशेषतः महाविद्यालयीन तरुण-तरुणींची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि दांडिया-गरब्याच्या तालावर रंगणाऱ्या या उत्सवामुळे शहरातील वातावरण चैतन्यमय होणार आहे. नऊ दिवस भक्तिभावासोबतच नृत्य, संगीत आणि उत्साहाची पर्वणी अनुभवण्यासाठी पिंपरी-चिंचवडकर सज्ज झाले आहेत.



## भूमिका

**लोकशाहीत प्रश्न विचारणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. मात्र, प्रश्न विचारणाऱ्यांचे म्हणणे ऐकण्याऐवजी त्यांच्यावरच आरोप होत असतील, तर ही चिंतेची बाब आहे. नीट परीक्षा घोटाळा, पुण्यातील डीजेचा कर्णकर्कश आवाज आणि एमपीएससी पेपरफुटीविरोधातील तरुणांची आंदोलने अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची जिद्द अधोरेखित करतात.**

# दुष्काळाचे चक्र तोडण्यासाठी घोषणांपलीकडे जावे!



अभिजित दीपके, विद्यानंद बापट आणि विवेकानंद पाटील या तरुणांनी आपल्या विचारांनी आणि कृतीने समाजाचे लक्ष वेधले आहे. संविधान, बुद्धिप्रामाण्यवाद आणि राज्यशास्त्राचा अभ्यास करून ते आपापले मुद्दे प्रभावीपणे मांडतात. उच्चशिक्षण, वैचारिक समृद्धी आणि सोशल मीडियाच्या प्रभावी वापरातून त्यांनी सार्वजनिक चर्चेत स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्याकडे राजकीय घराण्याचा वारसा नाही, सत्तेचे पाठबळ नाही किंवा मोठ्या नेत्यांची पाठराखणही नाही. तरीही व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवण्याचे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे धाडस ते दाखवतात.

स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहून समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच महत्त्वाचा आहे.

विवेकानंद पाटील यांचा संघर्ष विशेष अंतर्मुख करणारा आहे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून सरकारी सेवेत जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणाला परीक्षेतील कथित गैरप्रकारांचा सामना करावा लागतो, तेव्हा त्याचा केवळ परीक्षेवरील नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो. अशा परिस्थितीत निराश होऊन माघार घेण्याऐवजी व्यवस्थेला जाब विचारणे, ही लोकशाहीसाठी सकारात्मक बाब आहे. पाटील यांनी घर बांधून देण्याच्या मदतीपेक्षा तरुणांच्या स्वप्नांचे भवितव्य महत्त्वाचे असल्याचा मुद्दा मांडला. त्यांच्या भूमिकेतून स्वतःच्या वैयक्तिक अडचणींपेक्षा व्यापक सामाजिक प्रश्नांना प्राधान्य देण्याची वृत्ती दिसून येते.

मात्र, प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधाचा सामना करावा लागतो. कधी त्यांच्यावर टीका होते, तर कधी त्यांना विशिष्ट विचारसरणीचे ठरवून बदनाम केले जाते. एखाद्याच्या भूमिकेशी असहमत असणे हा लोकशाहीचा भाग आहे; पण त्याने उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी त्याच्यावर लेबल लावणे ही लोकशाही संवादाची पीछेहाट आहे. व्यक्तीच्या हेतूंवर संशय घेण्यापेक्षा त्याने मांडलेल्या मुद्द्यांची सत्यता तपासणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रश्न चुकीचा असेल, तर त्याचे उत्तर तर्काने देता आले पाहिजे; आणि प्रश्न योग्य असेल, तर त्यावर सुधारणा करण्याची तयारीही दाखवली पाहिजे.

प्रत्येक आंदोलन यशस्वी होईलच असे नाही. प्रत्येक मागणी मान्य होईल किंवा प्रत्येक संघर्षातून तातडीने बदल घडेल, याचीही खात्री नसते. तरीही आंदोलने समाजाला आत्मपरीक्षणाची संधी देतात. अन्यायाविरुद्धची अस्वस्थता जिवंत ठेवतात आणि व्यवस्थेला उत्तरदायी राहण्याची आठवण करून देतात. तरुणांच्या प्रत्येक मागणीला पाठिंबा देणे आवश्यक नाही; त्यांच्या प्रत्येक कृतीचे समर्थन करणेही गरजेचे नाही. मात्र, त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आणि प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. कारण प्रश्न विचारणारे आवाज दाबून समाज प्रगत होत नाही. उलट, प्रश्न विचारण्याची मोकळीक टिकवूनच लोकशाही बळकट होते. म्हणूनच आज प्रश्न तरुण किती बोलतात हा नसून, त्यांचे म्हणणे ऐकण्याइतका विवेक समाजात उरला आहे का, हा आहे.

## प्रासंगिक »

### जीवाभावाची मैत्री

**एका गावात अनिकेत नावाचा मुलगा राहत होता. त्याच्या घराजवळ एक जुनी विहीर होती. एके दिवशी विहिरीजवळ त्याला जखमी घुबड दिसले. घुबडाला उडता येत नव्हते. अनिकेतने त्याला घरी आणले आणि पशुवैद्याच्या मदतीने त्याच्यावर उपचार केले.**

काही दिवसांत घुबड बरे झाले. अनिकेतने त्याला जंगलात सोडले. घुबड उडून गेले, पण अनिकेतला वाटले की त्याने केलेली मदत आता संपली.

काही महिन्यांनी अनिकेत जंगलातील वाटेने जात असताना अचानक जोरदार पाऊस सुरू झाला. अंधार पडल्यामुळे त्याला रस्ता सापडेना.

तो एका झाडाखाली थांबला. तेवढ्यात त्याला झाडावरून घुबडाचा आवाज ऐकू आला. घुबड पुढे उडत गेले आणि अनिकेत त्याच्या मागे चालू लागला.

काही वेळाने तो सुरक्षितपणे गावात पोहोचला.अनिकेतला जाणवले की निःस्वार्थपणे केलेली मदत कधी ना कधी अनपेक्षित रूपात परत येऊ शकते.

- तात्पर्य : दयाळूपणा कधीही व्यर्थ जात नाही; प्रत्येक जीवाशी माणुसकीने वागावे.

**दुष्काळासारख्या संकटाचा सामना करताना सरकारने घाबरून न जाता धैर्याने आणि तारतम्याने निर्णय घेणे आवश्यक असते. मात्र, संकटाच्या काळात प्रशासनानेच विवेक गमावला, तर सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढतात.**

# दुष्काळ निसर्गाचा, फटका नियोजनशून्यतेचा!



यंदा महाराष्ट्राला कमी पाऊस आणि पावसातील दीर्घ खंडाचा मोठा फटका बसला आहे. अनेक भागांतील खरीप पिके करपली असून, धरणांमधील पाणीसाठ्याबाबतही चिंता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि शेतीच्या पाण्याचे नियोजन ही सरकारसमोरील प्रमुख आव्हाने आहेत.

राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असला, तरी उपाययोजनांमध्ये स्थानिक परिस्थितीचा विचार होणे गरजेचे आहे. पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांना पाण्याची गरज असताना धरणांमधील पाणी वापरण्याबाबत अधिक लवचिक निर्णय घेता आले असते. त्यानंतर पाणीकपातीची घोषणा आणि दुष्काळी उपाययोजनांचा दीर्घ कालावधी निश्चित करण्यात आला. पुढील पावसाळ्याबाबतही आताच कठोर अंदाज बांधण्याऐवजी उपलब्ध परिस्थितीनुसार निर्णय घेणे अधिक योग्य ठरले असते.

खरीप हंगामातील नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा वेळी रब्बी हंगामातून काही प्रमाणात नुकसान भरून काढण्याची संधी असते. गहू, हरभरा आणि करडई यांसारख्या पिकांसाठी पाणी उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो. मात्र, संपूर्ण राज्यासाठी एकच धोरण राबविल्यास ज्या भागांत पाणी उपलब्ध आहे, तेथील शेतकऱ्यांचेही नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीचा विचार करताना सरसकट निर्बंध लादण्याऐवजी स्थानिक गरजांना प्राधान्य द्यायला हवे. राज्यातील पर्जन्यमान आणि धरणांतील पाणीसाठा सर्वत्र सारखा नाही. मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील परिस्थिती गंभीर असताना काही भागांत तुलनेने समाधानकारक पाऊस झाला आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यातील पाण्याची उपलब्धता, पिकांची स्थिती आणि शेतकऱ्यांची गरज यांचा स्वतंत्र आढावा घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. पाण्याचे योग्य नियोजन केल्यास उपलब्ध साठ्यातून शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजा संतुलित करता येतील.

दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलसंधारण, भूजल पुनर्भरण, ठिबक आणि तुषार सिंचन यांसारख्या उपाययोजनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. संकट आल्यानंतरच या उपायांची आठवण होणे योग्य नाही. हवामानातील बदल आणि वारंवार उद्भवणारी पाणीटंचाई लक्षात घेऊन दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. निसर्गाच्या संकटाला पूर्णपणे रोखता येत नसले, तरी योग्य नियोजनाने त्याची तीव्रता कमी करता येते. म्हणूनच सरकारने केवळ दुष्काळ जाहीर करून थांबू नये, तर स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. पाण्याच्या संकटाइतकाच विवेकाचा दुष्काळही घातक असतो. तो दूर करण्यासाठी प्रशासनाने तारतम्य, समन्वय आणि दूरदृष्टी दाखवणे हीच काळाची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



जेवितां ही घरी ।
नाक हागतिया परी ॥१॥

ऐसियाचा करी चाळा ।
आपुली च अवकळा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दुष्काळ पाहून केंद्रीय पथक भावुक!

## महाराष्ट्रातील गंभीर परिस्थितीची पाहणी; केंद्राकडून जास्तीत जास्त मदतीची ग्वाही

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर असून शेतपिके हिरवी दिसत असली तरी त्यातून उत्पादन मिळण्याची शक्यता नाही,पाण्याचे स्रोत आटू लागल्याने जनावरांच्या चारा,पाण्याचा प्रश्न गंभीर असल्याचे सांगताना आज केंद्राच्या दुष्काळ पाहणी पथकातील अधिकाऱ्यांचे डोळे भरून आले. राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीची आम्हाला कल्पना असून केंद्राच्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत देण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही या पथकाने राज्य सरकारला दिली.**



### पिण्याच्या पाण्याला प्राधान्य

मुंबई आणि पुण्यासारख्या मोठ्या शहरांना काही दिवस झालेल्या पावसाचा लाभ झाला असला तरी उर्वरित महाराष्ट्रात, विशेषतः ग्रामीण भागातील लहान गावांमध्ये पाण्याचे स्रोत आटले आहेत. या भागांत मोठ्या प्रमाणावर टँकरची व्यवस्था करावी लागणार आहे. टँकरद्वारे पाणी पुरवठ्यात तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक गावापर्यंत पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पाणी पोहोचविण्याचा आराखडा राज्य शासन तयार करीत आहे. ऑगस्ट 2027 पर्यंत उपलब्ध पाण्याचे पहिले आरक्षण पिण्यासाठी करण्यात आले आहे. त्यात नागरिक आणि पशुधनासाठी आवश्यक पाण्याची स्वतंत्र तरतूद केली असून त्यानंतरच अन्य वापरासाठी पाणी उपलब्ध केले जाईल. या आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

एल निनोच्या प्रभावामुळे राज्यात अभूतपूर्व दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून सरकारने २६५ तालुक्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारने अधिकाऱ्यांचे पथक धाडले असून या पथकाने गेले चार दिवस राज्याच्या विविध भागातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर आज या पथकाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन दुष्काळी परिस्थितीवर चर्चा केली. वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीस आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाचे प्रमुख तथा केंद्रीय संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्यासह केंद्रीय पथकातील सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना फडणवीस यांनी राज्यात उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पुढील सहा ते आठ महिने अधिक आधार देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी रोजगारनिर्मिती, गरजूंपर्यंत अन्नधान्य पोहोचविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पशुधनासाठी चारा-पाणी उपलब्ध करून देण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येत असल्याची माहिती केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकास दिली. केंद्रीय पथकाकडून दुष्काळी भागातील परिस्थितीबाबतचा अहवाल केंद्र शासनाला सादर होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. केंद्रीय पथकाने अत्यंत विस्तृत दौरा करून तळागाळापर्यंत प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. त्यामुळे नागरिकांमध्ये आपल्या अडचणी समजून घेतल्याचे समाधान निर्माण झाले असल्याचे या वेळी केंद्रीय पथकाला सांगितले. केंद्रीय पथकाच्या संवेदनशील पाहणीमुळे दुष्काळाची तीव्रता केंद्र शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मान्सूनच्या पहिल्या दोन महिन्यांत चांगला पाऊस झाल्याने विक्रमी उत्पादनाची अपेक्षा होती. पिके फुलोऱ्याच्या अवस्थेत असतानाच त्यानंतर पावसात सुमारे दोन महिने खंड पडला. त्यामुळे सोयाबीन पिकाला अनेक ठिकाणी सर्वाधिक झळ बसली. तर कापूस, तूर आणि ऊस ही पिकेही बाधित झाली आहेत. पाण्याअभावी रब्बीची पेरणी होण्याची शक्यता कमी असून उन्हाळी पिकांनाही वाव राहिलेला नाही. खरीप हंगामातील नुकसान रब्बी किंवा उन्हाळी पिकातून भरून काढण्याची संधीही यंदा शेतकऱ्यांना मिळणार नाही. शेतीबरोबरच शेतमजुरी करणाऱ्या लहान शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे रोजगार आणि अन्नसुरक्षेच्या योजनांच्या माध्यमातून नियोजन करुन मदत देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन

दुष्काळी परिस्थितीत केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून जलसाठ्यांतील गाळ काढणे, दुरुस्ती आणि पुनरुज्जीवनाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येतील. यापूर्वी 25 हजार गावांमध्ये राबविलेल्या कामांमुळे 15 ते 17 टक्के पाणी तूट असतानाही त्या भागांना दिलासा मिळाला. सॉफ्टवेअर आणि ॲपच्या माध्यमातून अशा कामांची पारदर्शक अंमलबजावणी करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

## राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राजीनामा द्यावा; मराठा क्रांती मोर्चाची मागणी

**महाईन्यूज । पुणे**

**मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमिती काम करत नसून, समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आली. मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकावे, यासाठी नेमलेल्या संस्था-संघटना, अभ्यासक आणि समाजबांधवांशी समितीने एकही बैठक घेतली नसल्याचा आरोप मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी केला.**



मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक राजेंद्र कोंढरे, किरण गायकर, किशोर चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत ही मागणी केली. विखे यांनी राजीनामा न दिल्यास त्यांच्या शिर्डी मतदारसंघांमध्ये मराठा समाजाची बैठक घेऊन प्रश्न विचारणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकावे, यासाठी समिती नेमण्यात आली आहे. मात्र, या समितीने संस्था-संघटना, अभ्यासक आणि समाजबांधवांशी एकही बैठक घेतली नाही. विखे-पाटील आणि त्यांची समिती काहीही काम करत नाहीत, असे आरोपही करण्यात आले.

कोंढरे म्हणाले, 'मराठा आरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये अनेक मंत्री आहेत. काही खात्यांचे सचिव आणि अधिकारी आहेत. मात्र, या समितीची आढावा बैठक अर्धा तासही होत नाही. अधिकारी काहीतरी सादरीकरण करतात. त्याच आधारे निर्णय होतात. या निर्णयांचे पुढे काहीही होत नाही. या समितीने मराठा आरक्षणावर ८० टक्के काम आणि इतर योजनांवर २० टक्के काम केले पाहिजे. त्याऐवजी कुणबी प्रमाणपत्र एवढाच विषय समितीने हाती घेतला आहे. त्यातही त्यांना शंभर टक्के यश मिळाले नाही.'

'आरक्षणाच्या पर्यायांबाबत मराठा समाजामध्ये संभ्रम आहे. कुणबी जात प्रमाणपत्र काढून लाभ मिळेलच, असे सांगता येत नाही. त्यामुळे कोणत्या पर्यायातून कायदेशीररीत्या लाभ मिळू शकतो, याबाबत राज्य सरकारने स्पष्ट भूमिका मांडावी. मराठा आरक्षण, कुणबी प्रमाणपत्रे आणि एसईबीसी आरक्षणासंदर्भातील न्यायालयीन प्रकरणांचा एकत्रित आढावा घेऊन श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी,' अशी मागणीही कोंढरे यांनी केली.

गायकर म्हणाले, 'मराठा समाजातील महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी विखे यांच्याकडे वेळ नाही. सातत्याने मागणी करूनही समाजबांधव, मराठा आरक्षण प्रश्नावरील अभ्यासक-संस्था-संघटनांची बैठक घेण्यास विखे यांच्याकडून टाळाटाळ केली जाते. आरक्षणाची जबाबदारी असलेल्या मंत्र्यांना समाजाचे प्रश्न सोडविता येत नसतील, तर त्यांनी पदावरून बाजूला व्हावे.'

'विखे यांनी निविदांच्या माध्यमातून समाजात गटतट निर्माण करण्याचे पाप केले. त्यामुळे समाजातील मूळ प्रश्न मागे पडले असून, त्याची नैतिक जबाबदारी म्हणून त्यांनी मंत्रिपदाचाही राजीनामा द्यावा. मराठा आरक्षणाबरोबरच सारथी, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आदी संस्थांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्या आणि समाजातील इतर अनेक प्रश्न प्रलंबित आहेत,' असा आरोप गायकर यांनी केला.

# CJP पुन्हा रस्त्यावर उतरणार

## “आंदोलन न करण्याच्या बाँडवर सही केलीच नाही”; अभिजित दिपकेंची सूचक पोस्ट

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके, आशुतोष रांका आणि सौरव दास यांना शनिवारी १० ऑक्टोबर रोजी पोलिसांनी विमानातूनच ताब्यात घेतलं. जंतर मंतरच्या दिशेने आंदोलनाच्या हेतून जाणाऱ्या या तिघांना ताब्यात घेतल्यानंतर ते दिवसभर संपर्काच्या बाहेर होते. आज सकाळी त्यांना विशेष कार्यकारी न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर केल्यानंतर सोडून देण्यात आलं. दरम्यान, वर्षभर देशात शांततेचा भंग करणार नाही, या अटीवर त्यांना सोडण्यात आल्याची माहिती सीजेपीची कायदेशीर सल्लागार रत्ना सिंग यांनी दिली. दरम्यान, अभिजीत दिपके यांनी यासंदर्भात आता महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे.**



“अभिजीत दिपके, आशुतोष रांका आणि सौरभ दास यांना १० ऑक्टोबर रोजी बीएनएसएसच्या कलम १२६/१७० अन्वये प्रतिबंधात्मक अटक करण्यात आली होती. सर्व कायदेशीर प्रक्रियांचे पालन करून, त्यांना आज दिल्ली कँट येथील एसईएम न्यायालयात हजर करण्यात आले. एक वर्षाच्या कालावधीसाठी शांतता आणि चांगल्या वर्तणुकीची हमी म्हणून ५० हजार रुपयांचा जामीन अर्ज भरण्यात आला आणि एसईएम न्यायालयाने त्यांची सुटका केली”, अशी माहिती दिल्ली पोलिसांनी दिली.

सुटका झाल्यानंतर अभिजीत दिपके त्याच्या गावी परतले आहेत. त्यांच्या आजीचं निधन झाल्याने अंत्यदर्शनाला ते छत्रपती संभाजीनगर येथे गेले असून आंदोलन सुरूच राहणार असल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, वर्षभरासाठी शांतता करार केल्याने ते आता आंदोलन करणार की नाही हा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र यावर त्यांनी आता उत्तर दिलं आहे. आंदोलन करणार नसल्याच्या कोणत्याही बॉण्डवर सही केली नसल्याचं अभिजीत दिपके म्हणाले.

अभिजीत दिपके म्हणाले, “आम्ही आंदोलन करणार नाही अशा कोणत्याही बॉण्डवर स्वाक्षरी केलेली नाही. आम्ही पुन्हा रस्त्यावर उतरू”, असं अभिजीत दिपके म्हणाले.

तर, आता खऱ्या अर्थाने लढाई सुरू झाली असल्याची प्रतिक्रिया सीजेपीच्या नेत्यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. नरेंद्र मोदींनी नागरिकांमध्ये युद्ध सुरू केलं असून ज्ञानेश कुमारांचा राजीनामा घेत नाहीत तोवर मागे हटणार नसल्याची भूमिका सीजेपीने आज जाहीर केली.

### सर्वोच्च न्यायालयाने बजावली नोटीस

आंदोलनादरम्यान वाहतूक सेवांवरील निर्बंधांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशांचे कथित उल्लंघन केल्याप्रकरणी न्यायालयाने केंद्रीय गृहसचिव, दिल्लीचे पोलीस आयुक्त आणि दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) यांना अवमान कारवाईची नोटीस बजावली. सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात आणि आजूबाजूला कलम १६३ चे निर्बंध लागू केल्याची घोषणा करणाऱ्या नोटिसा अद्याप हटवल्या नसतील, तर त्या हटवण्याचे निर्देशही न्यायालयाने अधिकाऱ्यांना दिले. वकिलांना त्यांच्या व्यावसायिक कर्तव्यांचे पालन करण्यापासून रोखले जाऊ नये, असे न्यायालयाने म्हटले.

---

# नेपाळमध्ये पुन्हा जलप्रलय! दरड कोसळल्याने बुढी गंडकी नदीला महापूर

**महाईन्यूज । नेपाळ**

**महाराष्ट्रात पावसाने ओढ दिल्याने दुष्काळाचं संकट ओढवलेलं असतानाच आता नेपाळमध्ये पुन्हा एकदा पूर आला आहे. मागील महिन्यात पुराचं संकट नेपाळमध्ये आलं होतं. त्यातून सावरलेल्या नेपाळमध्ये आता पुन्हा पुराचं थैमान माजलं आहे. आता नेपाळमध्ये बुढी गंडकी नदीला पूर आला असून त्यामुळे तीन पूल वाहून गेले आहेत.**





नेपाळमधील गोरखा जिल्ह्यात ११ ऑक्टोबर रोजी पुन्हा पुराची परिस्थिती निर्माण झाली. चुमनुब्री गावाजवळ डोंगरावरील दरड कोसळल्याने बुढी गंडकी नदीचा प्रवाह अडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे नदीच्या खालच्या भागात पाण्याचा प्रवाह अचानक वाढून पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. या पाण्याच्या जोरदार प्रवाहात तीन पूल वाहून गेले, तर अनेक घरांचे आणि सार्वजनिक सुविधांचे नुकसान झाले. काही ठिकाणी रस्ते खचल्याने वाहतुकीवरही परिणाम झाला आहे.

या पुरानंतर आणि आलेल्या प्रचंड पाण्याच्या प्रवाहामुळे आणखी नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केलं आहे. नदीच्या जवळ जाणे टाळा, तसेच सुरक्षित आणि उंचावरील ठिकाणी आश्रय घ्यावा, अशा सूचना नागरिकांना देण्यात आल्या आहेत. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन पथके स्थानिकांच्या मदतीने काम करत आहेत. संभाव्य धोका लक्षात घेऊन आसपासच्या गावांतील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

नेपाळमध्ये २०२६ च्या पावसाळ्यात पुरामुळे मोठी जीवितहानी आणि वित्तहानी झाली. २६ ऑगस्ट रोजी भोटेकोशी आणि त्रिशूली नद्यांना आलेल्या विनाशकारी पुराचा रसुवा, नुवाकोट आणि धादिंग जिल्ह्यांना मोठा फटका बसला. या महापुरात १४०३ मृतदेह आढळले तर ६ हजारहून जण बेपत्ता होते. या आपत्तीत घरे, रस्ते, पूल आणि जलविद्युत प्रकल्पांचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर २४ ते २८ सप्टेंबरदरम्यान झालेल्या मुसळधार पावसामुळे नेपाळच्या विविध भागांत पुन्हा पूर आणि भूस्खलनाच्या घटना घडल्या. नेपाळ रेडक्रॉस सोसायटीच्या १ ऑक्टोबरच्या परिस्थिती अहवालानुसार, या अतिवृष्टीत ३० जणांचा मृत्यू झाला, १५ जण जखमी झाले, तर तीन जण बेपत्ता होते. सलग आलेल्या या नैसर्गिक आपत्तींमुळे नेपाळमधील जनजीवन, वाहतूक व्यवस्था आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले.



# नुसरतची पोस्ट चर्चेत!

बॉलिवूड अभिनेत्री नुसरत भरुचा हिच्या चाहत्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. बाली येथे झालेल्या अपघातात पाठीच्या कण्याला गंभीर दुखापत झाल्यानंतर नुसरतवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. अभिनेत्रीने स्वतः सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत आपल्या प्रकृतीबाबत अपडेट दिले आहे. नुसरतने इन्स्टाग्रामवर हॉस्पिटलमधील खोलीतून व्हीलचेअर आणि मावळत्या सूर्याचा सुंदर फोटो शेअर केला आहे. या फोटोसोबत तिने आपला सकारात्मक दृष्टिकोन आणि जिद्द व्यक्त केली आहे. 'पिक्चर अभी बाकी है मेरे दोस्त' असे म्हणत तिने आयुष्यातील हा कठीण प्रसंगही धैर्याने सामोरे जाण्याचा संदेश दिला आहे. "मी नेहमीच सूर्यास्ताचा पाठलाग करते आणि बघता बघता माझं दृश्य बदललं. पण चित्र अजूनही तिथेच आहे, कारण पिक्चर अभी बाकी है मेरे दोस्त," असे पोस्टमध्ये नुसरतने म्हटले आहे. नुसरत भरुचा वैयक्तिक कामानिमित्त आणि सुट्टीचा आनंद घेण्यासाठी बाली येथे गेली होती. मात्र, तिथे तिचा अपघात झाला आणि तिच्या पाठीच्या कण्याला फ्रॅक्चर झाल्याची माहिती समोर आली. पुढील उपचारांसाठी तिला एअर ॲम्ब्युलन्सने मुंबईत आणण्यात आले. तिच्यावर शस्त्रक्रिया होणार असल्याच्या वृत्तामुळे चाहते चिंतेत होते. आता शस्त्रक्रियेनंतर तिने शेअर केलेल्या पोस्टमुळे तिच्या प्रकृतीबाबत चाहत्यांना दिलासा मिळाला आहे.



# कतरिनाचा लूक पाहून चाहते थक्क!

बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ आई झाल्यावर तिच्या वाढत्या वजनामुळे खूप ट्रोल झाली होती. त्यानंतर नुकतीच ती लंडनमध्ये एका खास कार्यक्रमात सहभागी झाली, जिथे तिच्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. परंतु, लंडनच्या या कार्यक्रमातील तिचा रॉयल अंदाज त्या सर्व ट्रोलर्ससाठी चोख प्रत्युत्तर देणारा ठरला आहे. कतरिनाचा ब्युटी ब्रँड KayBeauty जगभरात प्रसिद्ध आहे. याच ब्रँडच्या लंडनमधील वर्षपूर्ती सोहळ्याच्या कार्यक्रमानिमित्त तिने लंडनमध्ये उपस्थिती लावली होती. तिचा हा शानदार लूक प्रसिद्ध स्टायलिस्ट रिया कपूरने डिझाइन केला होता. यादरम्यान तिने स्वीडिश लक्झरी ब्रँड 'टोटोम'चा अर्थी ब्राऊन आऊटफिट परिधान केला होता, ज्यामध्ये तिचा अंदाज अत्यंत क्लासी दिसत होता. या आऊटफिटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिचा ब्राऊन रंगाचा स्कर्ट, जो धोती स्टाईलपासून प्रेरित होता. चॉकलेट-ब्राउन ड्रेप स्कर्ट, टेलर ब्लेझर, ब्लॅक टॉप, बेली शूज या लूकमध्ये कतरिना खूपच सुंदर दिसत आहे. कतरिनाने आपला मेकअप एकदम साधा आणि नैसर्गिक ठेवला होता. अवघ्या महिन्याभरात तिचा बदललेला लूक पाहून चाहतेही थक्क झाले आहेत. दरम्यान, कतरिना कैफला नोव्हेंबर २०२५ मध्ये मुलगा झाला. विहान कौशलच्या जन्मानंतर कतरिना मीडियापासून दूर होती. मात्र, गणेशोत्सवात कतरिना पती विकी कौशलसह अंबानींच्या घरी पोहोचली होती. विहानच्या जन्मानंतर कतरिनाचं वजन वाढल्याने तिला सोशल मीडियावर बरंच ट्रोल करण्यात आलं होतं.

# सोहम शाहचा आलियाबाबत मोठा खुलासा!

२०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'तुबांड' या हॉरर चित्रपटाने कोणत्याही मोठ्या स्टारच्या पाठबळाशिवाय प्रेक्षकांच्या मनावर वेगळी छाप पाडली. भय, रहस्य आणि थरार यांचा अनोखा संगम असलेल्या या चित्रपटाला कालांतराने मोठी लोकप्रियता मिळाली. आता या चित्रपटाचा सिक्वेल 'तुबांड २' प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

अभिनेता आणि निर्माता सोहम शाह या चित्रपटावर काम करत असून, अभिनेत्री आलिया भट्ट आणि अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या चित्रपटासाठी आलिया भट्टची निवड कशी झाली, याबाबत सोहम शाहने महत्त्वाचा खुलासा केला आहे.

तुंबाड २ साठी आलियासारख्या लोकप्रिय अभिनेत्रीची निवड झाल्याने चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. अलीकडेच सोहम शाहने चित्रपटाच्या कास्टिंग प्रक्रियेविषयी सांगितले. आलियाला चित्रपटाची पटकथा ऐकवल्यानंतर तिने सकारात्मक प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे, अवघ्या दोन भेटींमध्ये चित्रपटात काम करण्यासाठी तिने होकार कळवला. सोहम शाहने आलियाचे कौतुक करताना सांगितले की, ती एक प्रामाणिक आणि व्यावसायिक अभिनेत्री आहे. अभिनयासोबतच तिला चित्रपट व्यवसायाचीही चांगली समज आहे. पहिल्या भेटीत आलियाने चित्रपटाबाबत काही महत्त्वाचे प्रश्न विचारले होते. तिच्या प्रश्नांवरून तिला कथेची आणि चित्रपटाच्या आशयाची सखोल समज असल्याचे जाणवले. आलियाला पटकथा ऐकवल्यानंतर आणि तिने ती वाचल्यानंतर काही दिवसांनी होकार कळवल्याचे सोहमने सांगितले.



# मॅट रेनशॉने मोडला विराट कोहलीचा सर्वात मोठा रेकॉर्ड!

## झुंजार खेळी; आठव्या ते अकराव्या क्रमांकाच्या फलंदाजांसोबत १७४ धावांची भागीदारी

**महाईन्यूज । डर्बन**

**कसोटी क्रिकेटमध्ये खालच्या फळीतील फलंदाजांना सोबत घेऊन संघाचा डाव सावरणे सोपे नसते. ऑस्ट्रेलियाचा फलंदाज मॅट रेनशॉने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत अशीच झुंजार खेळी करत भारताचा दिग्गज फलंदाज विराट कोहलीचा विक्रम मोडला. रेनशॉने ३१७ चेंडूंत २१ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १९० धावा केल्या.**

ऑस्ट्रेलियाची अवस्था १२४ धावांत सहा बाद अशी झाली असताना रेनशॉने डावाची धुरा सांभाळली. आठव्या ते अकराव्या क्रमांकाच्या फलंदाजांसोबत फलंदाजी करताना त्याने १७४ धावा जोडल्या. कसोटीच्या एका डावात खालच्या फळीतील फलंदाजांच्या साथीने सर्वाधिक धावा जोडण्याचा विक्रम आता त्याच्या नावावर झाला आहे.

यापूर्वी हा विक्रम विराट कोहलीच्या नावावर होता. २०१६ मध्ये मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर इंग्लंडविरुद्ध खेळताना विराटने १३५ धावांची खेळी केली होती. त्या डावात त्याने खालच्या फळीतील फलंदाजांसोबत १७१ धावा जोडल्या होत्या. रेनशॉने पाच धावांच्या फरकाने हा विक्रम मागे टाकला.

दुहेरी शतकापासून अवघ्या १० धावा दूर असताना सायमन हार्मरने रेनशॉला बाद केले. त्यामुळे त्याचे द्विशतक हुकले. मात्र, कर्णधार पॅट कमिन्सच्या ४३ आणि नॅथन लायनच्या २७ धावांच्या योगदानामुळे ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३९० धावांची मजल मारली.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा दक्षिण आफ्रिकेने एका विकेटच्या मोबदल्यात २७ धावा केल्या होत्या. त्यामुळे यजमान संघ अद्याप ३६३ धावांनी पिछाडीवर होता. रेनशॉच्या खेळीमुळे ऑस्ट्रेलियाला सामन्यात मजबूत स्थिती मिळाली.





### दुहेरी शतक हुकलं, पण इतिहास घडवला

या सामन्यात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाला हवी तशी सुरूवात करता आली नव्हती. अवघ्या १२४ धावांवर संघातील ६ फलंदाज तंबूत होते. अशा स्थितीत मॅट रेनशॉने फलंदाजी केली आणि ऑस्ट्रेलियाचा डाव सांभाळला. त्याने खालच्या फळीतील फलंदाजांसोबत मिळून महत्वपूर्ण पार्टनरशिप केली. १९० धावांवर पोहोचल्यानंतर दुहेरी शतक साजरं करण्यासाठी त्याला अवघ्या १० धावा करायच्या होत्या. त्यावेळी सायमन हार्मरने त्याला बाद करत माघारी धाडलं. त्यामुळे त्याचं दुहेरी शतक हुकलं. पण शेवटी फलंदाजी करताना कर्णधार पॅट कमिन्सने ४३ आणि नॅथन लायनने २७ धावांची खेळी करून रेनशॉला चांगली साथ दिली.

---



# हसन महमूदची ऐतिहासिक हॅट्रिक; बांगलादेशचा पहिला वेगवान गोलंदाज!

**महाईन्यूज । अबू धाबी**

**क्रिकेटमध्ये हॅट्रिक घेणे ही प्रत्येक गोलंदाजासाठी अभिमानाची बाब असते. बांगलादेशचा वेगवान गोलंदाज हसन महमूद याने अफगाणिस्तानविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी सामन्यात ऐतिहासिक कामगिरी केली. त्याने हॅट्रिक घेत बांगलादेशसाठी कसोटी क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा पहिला वेगवान गोलंदाज होण्याचा मान मिळवला. कसोटी क्रिकेटमध्ये हॅट्रिक घेणारा तो बांगलादेशचा तिसरा गोलंदाज ठरला.**




यापूर्वी २००३ मध्ये अलोक कपालीने पाकिस्तानविरुद्ध, तर २०१३ मध्ये सोहाग गाजीने न्यूझीलंडविरुद्ध कसोटीत हॅट्रिक घेतली होती. मात्र, या दोघांनंतर हसन महमूदने हा पराक्रम करत बांगलादेशच्या क्रिकेट इतिहासात आपले नाव नोंदवले.

सामन्याच्या तिसऱ्या दिवशी नव्या चेंडूने गोलंदाजी करताना हसनने अफगाणिस्तानच्या फलंदाजांवर दबाव निर्माण केला. त्याने प्रथम इसमत आलमला बाद केले. त्यानंतर कैस अहमदने चेंडूवर फटका मारण्याचा प्रयत्न केला; मात्र चेंडू बॅटची कडा घेऊन यष्टिरक्षक लिटन दासच्या हातात विसावला. सलग दोन चेंडूंवर दोन बळी मिळवत हसनने हॅट्रिकची संधी निर्माण केली.

हॅट्रिकच्या चेंडूवर जिया उर रहमान फलंदाजीसाठी आला. हसनने ऑफ स्टंपच्या बाहेर टाकलेला चेंडू वेगाने आत आला आणि फलंदाजाच्या पॅडला लागला. पंचांनी सुरुवातीला नाबाद ठरवले; मात्र बांगलादेशने डीआरएस घेतला. तंत्रज्ञानाच्या मदतीने चेंडू बॅटला लागला नसल्याचे आणि तो ऑफ स्टंपवर आदळणार असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे पंचांना आपला निर्णय बदलावा लागला आणि हसन महमूदची ऐतिहासिक हॅट्रिक पूर्ण झाली.

या कामगिरीमुळे हसनने बांगलादेशच्या कसोटी क्रिकेटमध्ये नवा इतिहास रचला असून, त्याच्या गोलंदाजीची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
दि. 12 ऑक्टोबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# ‘ब्रेकफास्ट विथ कॉर्पोरेटर’ संकल्पनेतून डॉ. कांबळेंचा पुढाकार

## अनधिकृत अवजड वाहनांवर आता ‘जॅमर कारवाई’! स्वखर्चाने जॅमर उपलब्ध करून दिले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी प्राधिकरणातील स्पाईन रोडच्या सेवा रस्त्यावर नो-पार्किंग झोनमध्ये अनधिकृतपणे पार्क केल्या जाणाऱ्या अवजड वाहनांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी पुढाकार घेतला आहे. कंटेनर, ट्रक आणि ट्रेलर्सवर प्रभावी कारवाई करण्यासाठी आवश्यक असलेली जॅमर यंत्रणा त्यांनी स्वखर्चाने उपलब्ध करून दिली. यानंतर आज प्रभाग क्रमांक ८ मधील नागरिकांसोबत ‘ब्रेकफास्ट विथ कॉर्पोरेटर’ या संकल्पनेअंतर्गत संवाद साधत वाहतूक पोलिसांच्या उपस्थितीत कारवाईलाही सुरुवात करण्यात आली. याशिवाय, या परिसरातील अनधिकृत अवजड वाहनांच्या पार्किंगला कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी लवकरच ‘हाइट बॅरियर्स’ बसविण्याच्या दृष्टीने महापालिका आणि पोलीस प्रशासनाशी समन्वय साधण्यात येत असल्याची माहिती डॉ. कांबळे यांनी दिली.**

“भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांचे आम्हाला सातत्याने मार्गदर्शन लाभते. प्रत्येक कामासाठी त्यांचा नेहमीच सकारात्मक प्रतिसाद मिळतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत,” असेही डॉ. कांबळे यांनी सांगितले.

मोशी प्राधिकरणातील स्पाईन रोडच्या सेक्टर क्रमांक ११ व १३ मधील सरदार चौक ते राजमाता जिजाऊनगर क्रांती चौक या परिसरातील सेवा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कंटेनर, ट्रक, ट्रेलर्स आणि इतर अवजड वाहने अनधिकृतपणे पार्क केली जातात. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांना वाहतुकीच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्कूल बस, रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक सेवांच्या वाहनांच्या वाहतुकीवरही याचा परिणाम होत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना व्हावी, यासाठी डॉ. सुहास कांबळे सातत्याने पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून होते. संबंधित परिसरात नो-पार्किंगचे फलक लावून आणि नियमित कारवाईची व्यवस्था करूनही अवजड वाहनांच्या पार्किंगचा प्रश्न पूर्णपणे सुटला नव्हता. मोठ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आवश्यक असलेली जॅमर यंत्रणा उपलब्ध नसल्याची बाब लक्षात आल्यानंतर डॉ. कांबळे यांनी स्वखर्चाने आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला.

यानंतर डॉ. कांबळे यांनी नागरिकांना सोबत घेत वाहतूक पोलिसांच्या पथकासह स्पाईन रोडच्या सेवा रस्त्याची पाहणी केली. नो-पार्किंग झोनमध्ये उभ्या असलेल्या कंटेनर, ट्रक आणि इतर अवजड वाहनांवर पोलिसांनी थेट कारवाई सुरू केली. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर ठोस पाऊल पडले आहे. केवळ दंडात्मक कारवाई करून न थांबता, भविष्यातही अशा प्रकारे अवजड वाहने अनधिकृतपणे पार्क केली जाणार नाहीत, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन समस्या, परिसरातील पायाभूत सुविधा आणि विकासकामांबाबत थेट संवाद साधण्याची ही संकल्पना नागरिकांसाठी उपयुक्त ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



### स्पाईन रोड कंटेनरमुक्त करण्याचा संकल्प

येत्या काळात स्पाईन रोड आणि परिसर अनधिकृत कंटेनर व अवजड वाहनांच्या पार्किंगमुक्त करण्याचा संकल्प यावेळी उपस्थित नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी केला. नो-पार्किंग झोनमध्ये अवजड वाहने आढळल्यास नागरिकांनी तातडीने वाहतूक पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस अधिकाऱ्यांनी केले.अनधिकृतपणे पार्क केलेल्या अवजड वाहनांवर यापुढेही आवश्यकतेनुसार कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

### हाइट बॅरियर्स बसविणार

स्पाईन रोड आणि परिसरात अनधिकृतपणे पार्क केल्या जाणाऱ्या कंटेनर आणि ट्रकच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी लवकरच संबंधित ठिकाणी ‘हाइट बॅरियर्स’ बसविण्यात येणार आहेत. यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे, अशी माहिती डॉ. सुहास कांबळे यांनी दिली.

### ‘ब्रेकफास्ट विथ कॉर्पोरेटर’मधून विविध विकासकामांवर सकारात्मक चर्चा!

‘ब्रेकफास्ट विथ कॉर्पोरेटर’च्या निमित्ताने नागरिकांशी संवाद साधताना सेक्टर क्रमांक ११ व १३, मोशी-चिखली प्राधिकरण परिसर कंटेनरमुक्त आणि वाहतूककोंडीमुक्त करणे, नवीन उद्याने विकसित करणे, संविधान भवन ते मोशी हायस्ट्रीटदरम्यान प्रस्तावित १२ मीटर रस्त्याचा विकास करणे, अनधिकृत हॉकर्सचे निर्मूलन करणे तसेच परवानाधारक हॉकर्सचे पुनर्वसन करणे अशा विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.



### पुढील पाच वर्षे ‘ब्रेकफास्ट विथ कॉर्पोरेटर’ उपक्रम सातत्याने राबविणार!

व्यवसायाने डॉक्टर असतानाही नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी वेळ देणारे आणि त्यांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणारे लोकप्रतिनिधी म्हणून डॉ. सुहास कांबळे यांची ओळख निर्माण होत आहे. ‘ब्रेकफास्ट विथ कॉर्पोरेटर’ या उपक्रमातून नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेण्याच्या या प्रयत्नाचे परिसरातील नागरिकांनी स्वागत केले.

### नागरिकांशी थेट संवाद आणि प्रत्यक्ष कारवाई!

नागरिकांच्या समस्या थेट जाणून घेण्यासाठी आणि त्यावर उपाययोजना करण्याच्या उद्देशाने डॉ. सुहास कांबळे यांनी आज ‘ब्रेकफास्ट विथ कॉर्पोरेटर’ या संकल्पनेअंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी चिखली वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामचंद्र घाडगे उपस्थित होते. त्यांच्याकडे अवजड वाहनांवर कारवाई करण्यासाठी आवश्यक असलेली जॅमर यंत्रणा सुपूर्द करण्यात आली.

# प्रियदर्शनी स्कूलच्या रुही बडगुजरची कराटेत रौप्य भरारी!

## अखिल भारतीय निमंत्रित कराटे स्पर्धेत प्रियदर्शनी स्कूलच्या रुहीने मोशीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील प्रियदर्शनी स्कूलमध्ये इयत्ता दुसरीत शिक्षण घेणाऱ्या रुही बडगुजर हिने कराटे स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पुण्यातील येरवडा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय निमंत्रित कराटे स्पर्धेत रुहीने रौप्यपदक पटकावले. आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर तिने हे यश मिळवत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. रुहीच्या या यशामुळे तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.**

कोणत्याही क्रीडा प्रकारात यश मिळविण्यासाठी नियमित सराव, कठोर मेहनत आणि सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे असतात. रुहीने कराटे प्रशिक्षणादरम्यान आत्मसात केलेली शिस्त आणि कौशल्य स्पर्धेत प्रभावीपणे सादर केले. रौप्यपदकाच्या रूपाने मिळालेले हे यश तिच्या पुढील क्रीडा प्रवासासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

लहान वयात स्पर्धात्मक वातावरणाचा अनुभव मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो. तसेच विजय आणि पराभव स्वीकारण्याची वृत्ती, प्रतिस्पर्ध्यांचा आदर करण्याची भावना आणि सातत्याने स्वतःमध्ये सुधारणा करण्याची प्रेरणा मिळते. रुहीच्या या यशातून इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात सहभागी होऊन आपले कौशल्य विकसित करण्याची प्रेरणा मिळणार आहे.

रुही बडगुजर हिने मिळविलेले रौप्यपदक हे तिच्या क्रीडा प्रवासातील महत्त्वाचे यश आहे. या यशामुळे तिचा आत्मविश्वास अधिक बळकट होण्यास मदत होईल. भविष्यातही तिने नियमित सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर क्रीडा क्षेत्रात नवनवीन यश संपादन करावे, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

लहान वयातच राष्ट्रीय स्तरावरील निमंत्रित स्पर्धेत पदक मिळविणाऱ्या रुहीचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. तिच्या या कामगिरीमुळे प्रियदर्शनी स्कूलचा गौरव वाढला असून तिच्या पुढील वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




### उत्कृष्ट कौशल्य आणि जिद्दीच्या जोरावर यश

अखिल भारतीय निमंत्रित कराटे स्पर्धेत विविध खेळाडूंना आपले क्रीडा कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली. या स्पर्धेत रुही बडगुजर हिने आत्मविश्वास, शिस्त, एकाग्रता आणि जिद्द यांचे प्रभावी दर्शन घडविले. लहान वयातच तिने कराटे या क्रीडाप्रकारात मिळविलेले यश तिच्या मेहनतीची आणि सरावातील सातत्याची साक्ष देणारे आहे. कराटे हा केवळ शारीरिक ताकदीचा खेळ नसून त्यासाठी मानसिक एकाग्रता, संयम, शिस्त, प्रसंगावधान आणि आत्मविश्वास यांचीही आवश्यकता असते. या गुणांचा योग्य समन्वय साधत रुहीने स्पर्धेत आपली छाप पाडली. तिच्या या कामगिरीमुळे लहान वयातच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविण्याची क्षमता तिने सिद्ध केली आहे.

### शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

रुहीने मिळविलेल्या या यशाबद्दल प्रियदर्शनी स्कूलच्या व्यवस्थापनाने आणि शिक्षकवृंदाने तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तिच्या यशामागे कराटे प्रशिक्षकांचे मार्गदर्शन तसेच पालकांचे प्रोत्साहन आणि सहकार्य महत्त्वाचे असल्याचे नमूद करत त्यांच्या योगदानाचेही कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा आणि सहशालेय उपक्रमांनाही महत्त्व देणे आवश्यक आहे. याच दृष्टिकोनातून प्रियदर्शनी स्कूल विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी प्रोत्साहित करीत आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि जिद्द विकसित व्हावी, यासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील आहे.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे आंतर-महाविद्यालयीन ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेत वर्चस्व

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि एम. एस. काकडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमेश्वरनगर येथे आयोजित आंतर-महाविद्यालयीन 'ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेत' राजमाता जिजाऊ महाविद्यालयाने चमकदार कामगिरी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले.**




या खेळाडूंनी मिळवलेल्या ५ पदकांच्या जोरावर राजमाता जिजाऊ महाविद्यालयाने संपूर्ण स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार श्री. विलास लांडे, सचिव श्री. सुधीर मुंगसे, खजिनदार श्री. अजित गव्हाणे, विश्वस्त श्री. विक्रांत लांडे, प्रभारी प्राचार्य प्रा. किरण चौधरी आणि रजिस्ट्रार सौ. अश्विनी भोसले यांनी सर्व विजेते खेळाडू तसेच क्रीडा संचालक डॉ. गणेश चव्हाण यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या या यशामुळे क्रीडा वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### विविध वजन गटांत मल्लांची पदकांची कमाई!

- प्रणव लांडगे (६० किलो) – सुवर्णपदक
- पार्थ कंधारे (६७ किलो) – सुवर्णपदक
- सारंग बोराडे (५७ किलो) – रौप्यपदक
- सिद्धांत बांगर (५५ किलो) – कांस्यपदक
- यश आढाव (७९ किलो) – कांस्यपदक

# कल्पतरू चौकातील कोंडी फोडण्यासाठी बॅरिकेट्स

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

शहरातील अत्यंत महत्त्वाचा आणि गजबजलेला भाग असलेल्या पिंपळे गुरव येथील कल्पतरू चौकात दररोज होणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी अखेर प्रशासनाकडून पावले उचलण्यात आली आहेत. या चौकात नवीन बॅरिकेट्स बसविण्यात आले असून, यामुळे वाहनांच्या हालचालींना शिस्त लागून वाहतूक सुरळीत होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

कल्पतरू चौकातून पुढे भोसरी, वल्लभनगर आणि पिंपरीच्या दिशेने मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. तसेच भोसरी ते वाकड बीआरटी रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी येथे मोठी वाहतूक कोंडी होत असते. या मार्गावर खासगी बसेस आणि इतर प्रवासी वाहनांचीही सतत ये-जा सुरू असते. त्यातच रस्ता अरुंद असल्याने सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. चौकात सिग्नल असूनही वाहतुकीचा वेग मंदावत असल्याने वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता.

या चौकातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि वाहनांच्या अनियंत्रित हालचालींना आळा घालण्यासाठी नवीन बॅरिकेट्स बसविण्यात आले आहेत. या व्यवस्थेमुळे वाहतुकीचा प्रवाह अधिक नियोजनबद्ध होण्यास मदत होऊ शकते आणि वाहनचालकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, बॅरिकेट्सची ही व्यवस्था प्रत्यक्षात किती प्रभावी ठरते, हे आगामी काही दिवसांतील वाहतुकीच्या स्थितीवरून स्पष्ट होईल.

# राजमाता जिजाऊ मुलींच्या संघाचे सलग पाचवे विजेतेपद

## ५६ धावांनी दणदणीत विजय मिळवत सलग पाचव्यांदा जिल्हास्तरीय विजेतेपदावर मोहोर!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मदनलाल धिंग्रा मैदान, निगडी येथे आयोजित करण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालय (लांडेवाडी, भोसरी) येथील १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने दिमाखदार कामगिरी करत सलग पाचव्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरले. या रोमहर्षक विजयामुळे संघाची शालेय विभागस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**





विजयी खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे आणि प्रशिक्षक श्री. दत्तात्रय वाळके यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल भोसरीचे प्रथम आमदार आणि संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. विलासराव लांडे साहेब यांनी सर्व खेळाडूंचे विशेष अभिनंदन करून पुढील विभागस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिं. चिं. मनपा स्थायी समितीचे माजी अध्यक्ष श्री. अजितभाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री. सुधीरभाऊ मुंगसे सर, पिं.चिं. मनपाचे माजी नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी., उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ. अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगीता गवस, प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी खेळाडूंचे मनापासून अभिनंदन केले. या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. खेळाडूंनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि सांघिक कामगिरीच्या जोरावर मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. आगामी विभागस्तरीय स्पर्धेतही खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

### ऑलराउंड कामगिरीचा ठसा

- महक मुल्ला: ५१ धावा आणि २ गडी बाद.
- श्रेया जगदाळे: ३९ धावा आणि ३ गडी बाद.

### विजयी संघ:

कु. ईशिता मुंगसे, विशाखा थोरात, आरोही बनसोडे, भूमिका जगताप, सिमरन राठोड, चिन्मयी चोपडे, महक मुल्ला, श्रेया जगदाळे, वंदना राजभर, श्रेयश्री दिवेकर, संस्कृती लेंडवे, श्रेया वहिले, राधिका जाधव, रेणुका पवार, आयुष्या बारणे आणि अश्विनी ढाले.

# पीसीसीओईने पटकावला एस्ट्रोवर्स अक्षयान मध्ये देशात प्रथम क्रमांक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**'एस्ट्रोवर्स अक्षयान २०२६' स्पर्धेत पीसीसीओईच्या टीम अनंतमने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या टीमचे भारतीय एरोस्पेस क्षेत्राकडे टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. टीम अनंतमने रॉकेटरी आणि स्पेस रिसर्च क्षेत्रात नवनवीन आव्हाने स्वीकारण्याच्या आणि अधिक उंची गाठण्याच्या दिशेने आपला प्रवास सुरू ठेवावा. आमच्या विद्यार्थ्यांना भविष्यातील एरोस्पेस आणि स्पेस टेक्नॉलॉजी क्षेत्रातील क्षमता विकसित करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येतील असे या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील टीम अनंतम - रॉकेटरी अँड स्पेस रिसर्च या विद्यार्थी संघाने 'एस्ट्रोवर्स अक्षयान २०२६' या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत सॉलिड रॉकेट मोटर लॉन्च कॅटेगरी मध्ये देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. 'अस्त्र' या रॉकेटने ९७३ मीटर उंची गाठली आणि रॉकेट प्रक्षेपण करणारी स्पर्धेतील एकमेव यशस्वी टीम आहे.

उत्तराखंड मधील हल्द्वानी येथे एस्ट्रोवर्स या संस्थेने आयोजित केलेल्या या स्पर्धेत देशभरातून नामांकित २० अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या संघाने सहभाग घेतला होता. या सर्वांमध्ये पीसीसीओईच्या टीम अनंतम ला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. सर्व टीमला सह संस्थापक शुभम कुमार, अजय रावत यांच्या हस्ते ३० हजार रुपये, स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

टीम अनंतम ही रॉकेटरी अँड स्पेस रिसर्च ही पीसीसीओई, पुणे येथील मोटर्स स्पोर्ट्स कौन्सिल अंतर्गत कार्यरत असलेली विद्यार्थि नेतृत्वाखालील रॉकेटरी आणि एरोस्पेस संशोधन संस्था आहे. या टीम समन्वयक प्रा. जयेश चोरडिया टीम प्रमुख विवेकानंद झांबरे सदस्य दिव्या पाटील, ओंकार पाटील, कुशल सरोदे, मानसी कटारिया, अनुष्का कालंत्रे, सोहम सपकाळ, साक्षवत भुसारे, प्रथम बोकेफोडे, माधव जोशी यांचा समावेश आहे.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक निळकंठ चोपडे टीम अनंतमच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. संशोधन व विकास अधिष्ठाता नरेंद्र देवरे, अधिष्ठाता डॉ. पद्माकर देशमुख, सहयोगी अधिष्ठाता अमित पंचवाडकर प्रा. डॉ. जयेश चोरडिया, डॉ. अश्विनी शिंदे यांनी मार्गदर्शन केले.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046